जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JUN 2017

पुण्यनगरी

# पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्या वृक्ष लागवड

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

जुलैच्या पहिल्या आठवड्यात राज्यभरामध्ये वृक्ष लागवड मोहीम राबविण्यात येणार असून कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ८ लाख ६० हजार वृक्ष लागवड केली जाणार आहे. वृक्षरोपणाचा प्रारंभ शनिवार, १ जुलै रोजी सकाळी ९ वाजता शिवाजी विद्यापीठ येथे महसूल व सार्वजनिक बांधकाममंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते आणि जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा शौमिका महाडिक व महापौर हसीना फरास यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

पर्यावरण संतुलनासाठी व जागतिक तापमानवाढीवर मात करण्यासाठी राज्य शासनाच्या वन विभाग, इतर विभाग व नागरिकांच्या सहभागातून संपूर्ण राज्यात १ ते ७ जुलै या कालावधीत ४ कोटी वृक्ष लागवड करण्याचा संकल्प केला आहे. जिल्ह्यामध्ये ८ लाख ६० हजार वृक्ष लागवड केली जाणार आहे.

यावेळी खासदार संभाजीराजे छत्रपती, खासदार धनंजय महाडिक, खासदार राजू शेट्टी, आमदार हसन मुश्रीफ यांच्यासह सतेज पाटील, सुजित मिणचेकर, राजेश क्षीरसागर, प्रकाश आबिटकर, चंद्रदीप नरके, उल्हास पाटील, सत्यजित पाटील, अमल महाडिक, संध्यादेवी कुपेकर, सुरेश हळवणकर, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमणार, आयुक्त अभिजित चौधरी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन मुख्य वनसंरक्षक अरविंद पाटील यांनी केले आहे.

30 JUN 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वासंती रासम : बहुआयामी शिक्षक

**काही व्यक्ती अशा असतात की, ज्यांच्या सहवासामुळे आपल्याला सतत प्रेरणा मिळत राहते. शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्र विद्याशाखेच्या पहिल्या महिला अधिष्ठाता (डीन) आणि राज्यशास्त्र विभागाच्या माजी विभागप्रमुख डॉ. वासंती रासम या त्यापैकी एक. वासंती रासम 30 जूनला सेवानिवृत्त होत आहेत. त्या निमित्ताने त्यांच्या कार्याचा थोडक्यात घेतलेला आढावा...**



डॉ. वासंती रासम यांचे बालपण आणि शिक्षण कर्नाटकातील हुबळी शहरात झाले. त्यांचे वडील कृष्णाजी कावळेकर रेल्वे खात्यात नोकरीला होते. त्यांचे मोठे बंधू डॉ. के. के. कावळेकर हे शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्राध्यापक आणि माजी विभागप्रमुख होते. लहानपणापासूनच अभ्यासात त्या हुशार होत्या. त्यांनी धारवाड विद्यापीठातून राज्यशास्त्र विषयात प्रथम येत सुवर्णपदक प्राप्त केले.

शिवाजी विद्यापीठात त्यांनी पीएच.डी.साठी प्रवेश घेतला. त्यांनी ज्येष्ठ डॉ. अशोक चौसाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वराज्य पक्ष' या विषयावर पीएच.डी. मिळवली. १९८२ मध्ये त्यांचा विवाह कोकणातील रहिवासी असणाऱ्या प्रतापचंद्र रासम यांच्याशी झाला. १९८६मध्ये त्या शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात रुजू झाल्या. 'आंतरराष्ट्रीय राजकारण आणि लोकप्रशासन' या विषयात त्यांचा व्यासंग आहे.

राज्यशास्त्र विभाग व शिवाजी विद्यापीठासाठी त्यांनी भरीव योगदान दिले. त्यांनी राज्यशास्त्र विषयाचे १७ ग्रंथ लिहिले आहेत. त्यांचे ५१ संशोधनपर लेख प्रसिद्ध झाले असून, १५६ संशोधनपर लेख सादर केले आहेत. त्यांनी पीएच.डी.साठी २१ आणि एम.फिल.च्या २१ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद, महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेच्या निर्मिती आणि व्यवस्थापनामध्ये त्यांनी मोठे योगदान दिले.

डॉ. वासंती रासम यांनी त्यांच्या कारकिर्दीत विविध पदे भूषविली. शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्र या विद्याशाखेच्या त्या पहिल्या महिला अधिष्ठाता, शिवाजी विद्यापीठ पदव्युत्तर शिक्षक संघटना (सुप्टा) च्या पहिल्या महिला अध्यक्षा, राज्यशास्त्र विभागाच्या पहिल्या महिला विभागप्रमुख होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. त्याचबरोबर शिवाजी विद्यापीठात व्यवस्थापन परिषद, सिनेट, विद्या परिषद, तक्रार निवारण समिती, परीक्षा प्रमाद समिती, संशोधन व मान्यता परिषदेवर त्यांनी काम केले. राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या अध्यक्ष ,स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र समन्वयक, श्रीमती शारदाबाई पवार अध्यासनाच्या समन्वयक, नेहरु अभ्यास केंद्र समन्वयक म्हणून त्यांनी काम पाहिले. शिवाजी विद्यापीठाच्या महिला वसतिगृहाच्या प्रमुख म्हणूनही त्या कार्यरत होत्या. घरापासून लांब असणाऱ्या विद्यार्थिनींचे प्रश्न त्यांनी अग्रक्रमाने सोडविले. मुलींच्या वसतिगृहात अनेक अभिनव उपक्रम सुरु करण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे. विद्यापीठाच्या विविध प्रशासकीय समित्यांवर त्या कार्यरत होत्या. एक सक्षम अधिकारी, शिक्षिका तसेच घर अशा तिहेरी जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे पार पाडल्या. सेवानिवृत्तीपूर्वी काही महीने अगोदर त्यांना सामाजिक विद्याशाखा अधिष्ठातापदाची जबाबदारी देण्यात आली.

डॉ. वासंती रासम यांच्या कार्याचा आलेख मोठा आहे. त्यांनी सतत विद्यार्थ्यांच्या तसेच प्राध्यापकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले. विद्यार्थी शिक्षण घेऊन स्वयंपूर्ण व्हावा यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. आज त्यांचे अनेक विद्यार्थी विविध पदांवर कार्यरत आहेत. महाविद्यालयांमध्ये अध्यापन करीत आहेत, तसेच शासनाच्या विविध खात्यांमध्ये कार्यरत आहेत. राज्यशास्त्र विभागासाठी आणि विद्यापीठाच्या विविध समित्यांवर काम करीत असताना स्वतःच्या हिताचा विचार न करता त्या कार्यरत राहिल्या. त्यांच्या कारकिर्दीस ३० जून रोजी ३१ वर्ष पूर्ण होऊन त्या निवृत्त होत आहेत.

**- डॉ. सुमेधा साळुंखे,**
मास कम्युनिकेशन,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

30 JUN 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उच्च शिक्षणात महिलांची संख्या वाढण्याची गरज

## शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाच्या प्रा. वासंती रासम : शैक्षणिक, प्रशासकीय पातळीवरील केली विकासात्मक कामे

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागात डॉ. वासंती रासम १९८६ साली सहयोगी प्राध्यापक म्हणून रूजू झाल्या. एक प्रभावी व्यक्तिमत्व, स्वतंत्र निर्णय क्षमता यामुळे विद्यापीठातील विविध अधिकार मंडळावर त्यांनी काम केले आहे. सामाजिक शास्त्र विभागाच्या पहिल्या महिला अधिष्ठाता म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या प्रभावी व्यक्तीमत्वाची छाप विद्यार्थी, इतर प्राध्यापक, कर्मचारी यांच्यावर आहे. शुक्रवार ३० जून रोजी त्या सेवानिवृत्त होत आहेत. त्यानिमित्त त्यांच्यांशी साधलेला संवाद.

**▶ देशातील स्त्री शिक्षणाचे चित्र गेल्या काही दिवसात कसे बदलले आहे?**

स्वातंत्र्योत्तर काळात विशेषत: महाराष्ट्रात सामाजिक कार्यकर्त्यांनी चळवळीच्या माध्यमातून महिलांच्या शिक्षणासंबंधात आग्रह धरला. राष्ट्रीय पातळीवर विद्यासागर आणि महाराष्ट्रात महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले या दांपत्यांचे स्त्री शिक्षणात मोठे योगदान आहे. फुले यांच्या दृष्टीकोनातून पाहिल्यास व्यक्ती सक्षम आणि सुज्ञ होतो. यासाठी त्यांनी



पारंपरिक व्यवस्थेला छेद देऊन मुलींना शिक्षण देण्यास सुरूवात केली. त्यांच्या प्रयत्नाचे फलित म्हणून आज निश्चितच शिक्षणात मुलींची संख्या वाढलेली दिसते. तरीही पुरूषप्रधान व्यवस्था प्रबळ असल्याने अपेक्षित असा शिक्षणामध्ये स्त्रियांना वाव मिळत नाही. दुसऱ्या बाजूला शिक्षण व्यवस्था आणि अभ्यासक्रम पाहता स्त्री सक्षमीकरण होण्याचे खूपच कमी प्रमाण दिसते. तसेच महिला सक्षम होऊनदेखील कुटुंबात व समाजात त्यांना योग्य तो न्याय मिळत नाही.

**▶ उच्च शिक्षण घेणाऱ्या महिलांची संख्या कमी का दिसते?**

दहावी–बारावीच्या निकालात मुलींचा टक्का वाढत असला तरी नोकरी किंवा व्यवसायामध्ये स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्यासाठी मुलींना प्रोत्साहन दिले जात नाही. ग्रामीण भागात रूढी परंपरा रूजलेल्या आहेत. त्यामुळे पालक आपले भविष्य सुरक्षित करण्याच्या दृष्टीने मुलगाच वंशाचा दिवा मानून मुलाला व्यावसायिक व उच्च शिक्षण देतात. मुलींना मात्र पारंपरिक विद्याशाखांचेच शिक्षण देण्याचा त्यांना विचार असतो. शिक्षणापेक्षा सरकारी नोकरी असणारा नवरा मिळवून देण्याकडे पालकांचे लक्ष अधिक असते. पालकांनी असे न करता मुलींना तिच्या आवडीनुसार शिक्षण दिले तर मुलीही आपले कर्तृत्व दाखवू शकतील.

**▶ राज्यशास्त्र आणि राजकारणाचा अभ्यास करणाऱ्या महिलांची संख्या अपवादात्मक का?**

देशात पुरूषप्रधान संस्कृती असल्याने राजकारणात महिलांना दुय्यम स्थान दिले जाते. महिलांमध्ये क्षमता असूनदेखील जेथे सत्ता जाणार असे वाटते त्याच ठिकाणी राजकीय पक्ष महिलांना राजकारणात स्थान देतात. महिलांनी मात्र राजकारणात मिळालेल्या संधीचे सोने केल्याची अनेक उदाहरणे आहेत. यामध्ये देशपातळीवर इंदिरा गांधी, सोनिया गांधी, सुषमा स्वराज, मायावती. तर कोल्हापूर जिल्ह्यातही निवेदिता माने, संध्यादेवी कुपेकर, महापौर हसीना फरास आदी महिलांनी स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. महिला घर आणि राजकारण दोन्हींचा समन्वय साधत प्रामाणिकपणे व दर्जेदार काम करताना दिसतात. राज्यशास्त्र विषय घेऊन शिक्षण घेणाऱ्या मुली आहेत, मात्र राजकारणात उतरायचे म्हंटले की राजकारण वाईट अशी भुमिका पालकांची असते. त्यामुळे राजकारण करण्याची इच्छा असूनही मुलींना या क्षेत्राकडे वळता येत नाही.

**▶ शिवाजी विद्यापीठातील एकूणच कामकाजाबद्दलचा तुमचा अनुभव काय?**

१९८६ साली विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागात सहयोगी प्राध्यापक म्हणून रूजू झाले. स्वत:च्या क्षमतेच्या जोरावर १९९० पर्यंत विद्यापीठ वर्तुळात वेगळी ओळख निर्माण झाली. त्यामुळे विद्यापीठाच्या विद्यापरिषद, व्यवस्थापन परिषद, अधिसभा अशा अनेक पदांवर काम करण्याची संधी मिळाली. मी मिळालेल्या संधीचे सोने करीत आजतागायत विद्यापीठ प्रशासनात अनेक महत्वाचे निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणीही केली आहे. यासाठी माजी कुलगुरु डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. अशोक चौसाळकर, प्रा. के. के. कावळेकर, प्रा. गुरव, डॉ. भालबा विभुते, डॉ. जे. एफ. पाटील आदींचे प्रोत्साहन लाभले. माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या कारकिर्दीत अनेक शैक्षणिक, ॲकॅडमिक पातळीवरील विकासात्मक कामे झाली. त्याची एक अधिष्ठाता म्हणून मी साक्षीदार आहे.अनेक पदांवर काम करीत असताना डॉ. साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले.